
म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय वा.प.
दा. क. ६९९३

IRBK-0106993
IRBK-0106993



# परीकथा

कथा चौथी

म. ग्रं. सं. ठाणें
विषय बाल वाङमय
वा. नं. ८८४

लेखक रामतनय

# परीकथा

कथा चौथी

# सुरेश

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम २४३३३
विभाग बा.वा.
क्रमांक ८८४
नों. दि. ३०।११५५
वाचनालय शाखा.

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. ६९९३ नों. दि. ...............
वि. बा.वा. क्र. ...............

: लेखक :

रा म त न य

१९५८

मूल्य आठ आणे

प्रकाशक
स. आ. जगताप,
जगताप-कारले प्रकाशन,
१९२ शुक्रवार, पुणें २.

आवृत्ति पहिली १९५८

पुढील आवृत्तींचे सर्व हक्क रामतनय यांचे चिरंजीव श्री. भास्कर गणेश वाळिंबे, बी.एस्सी., बी. ई. (सिव्हिल), ए. एम्. आय. ई. यांचेकडे राहातील.

चित्रकार : श्री. हवालदार

मुद्रक
मा. र. कारले,
जनसेवा मुद्रणालय,
१९२ शुक्रवार, पुणें २.

अनुक्रम २४३३३
विभाग बा. वा.
क्रमांक ८८४
नों. दि. ३०-९-५९

# लेखकाचें निवेदन

लहान मुलांना यक्ष, गंधर्व, पऱ्या, इत्यादींच्या अद्भुत कथा फार आवडतात. युरोपांतील निरनिराळ्या देशांच्या बाल-वाङ्मयांत अशा प्रकारच्या गोष्टी पुष्कळ आहेत. त्यांतले त्यांत स्वीडनमधील अशा कथालेखकांची प्रसिद्धि जगभर झाल्याचें दिसून येतें !

आपल्या भारत सरकारनेंहि १९५६ सालीं काढलेल्या एका पत्रकांत अशा पऱ्यांच्या गोष्टी लहान मुलांसाठीं अवश्य लिहाव्यात, असें म्हटलेलें आहे. या सर्व गोष्टींचा विचार करून या पऱ्यांच्या पांच गोष्टी मीं स्वतंत्रपणें लिहिल्या आहेत. भारतांतील प्राचीन वाङ्मयाचा अभ्यास या कथा लिहितांना मला फार उपयोगीं पडलेला आहे, हें मी येथें नम्रपणें नमूद करीत आहें.

या गोष्टी मीं लहान मुलांना वाचावयास दिल्या. त्यांना त्या फारच आवडल्या. प्रसिद्ध शिक्षण-शास्त्रज्ञांनीं व बाल-वाङ्मयसेवकांनीं या गोष्टी वाचून कांहीं उपयुक्त सूचना केल्या, त्याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहें.

**पहिल्या दोन कथांत मीं जोडाक्षरांचा उपयोग मुळींच केलेला नाहीं. शक्यतों लहान वाक्यें घातलेलीं आहेत. गोष्टी चटकदार व्हाव्यात, अशी काळजी घेतलेली आहे.**

प्रकाशकांनींहि सुंदर चित्रें, छानदार कागद व उत्कृष्ट छपाई यांसाठीं पुष्कळच झळ सोसली आहे. या साऱ्या श्रमांचें चीज जनता व सरकार उदारपणें करील, असा मला भरंवसा वाटतो.

नागपंचमी शके १८८०.
ता. १९ ऑगस्ट १९५८.
४६४ नारायण, पुणें २.

लेखक
**रामतनय**

IRBK-0106993
IRBK-0106993

## अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| १. पऱ्या हसूं लागल्या ! | ५ |
| २. यक्षांचे शाप ! | १४ |
| ३. अप्सरा व सुहासिनी ! | २४ |
| ४. पोपटाचा सुरेश झाला ! | ३२ |


माझ्या आवडत्या
बाळगोपाळांना
अर्पण

—रामतनय

ग्रंथ. क्र. ... ग्रा. वाचनालय ... नों. दि. 30-9-५१

## कथा-चौथी

# १. पऱ्या हसूं लागल्या!

सुहासिनी आपल्या राजवाड्यांत आली. तिन्ही पऱ्यांची तिला पूर्वींची माहिती होतीच. सुहासिनीचीं कारस्थानेंहि पऱ्यांना ठाऊक होतीं! आतां पऱ्यांनीं राणीवर उपकार केलेले होते. त्यामुळें राणी शरमिंधी होऊन गेलेली होती.



दीपचंद्र राजा, सुहासिनी आणि दोन्ही पऱ्या.

शिवाय देवळांतील पोपटानें राणीला सुरेशची आठवण करून दिलेली होती. ती मात्र राणीच्या मनास लागून राहिली होती.

राजवाड्यांतील सुंदर पलंगावर राणी विश्रांति घेत होती. पण तिचें मन मात्र स्वस्थ नव्हतें.

दीपचंद्र राजानें तिन्ही पऱ्यांचा चांगला सत्कार केला. त्यांनीं आणलेली बहुमोल संपत्ति पाहून राजा चकित झाला. अरुण व नलिनी यांना पऱ्यांच्या कर्तबगारीमुळें आपली आई घरीं आली, ही खूणगांठ पटली. पऱ्यांची योग्यता फार मोठी असल्याचें त्यांच्या अनुभवास आलें. तीं बहीण-भावंडें पऱ्यांना आपल्या आईसारखीं पूज्य मानूं लागलीं.

एकदां पऱ्या आणि सुहासिनी ह्या मजेनें बोलत बसल्या होत्या. त्या वेळीं सुहासिनी पऱ्यांना सहज म्हणाली,

" देवींनो, ते सोन्याचे घुंगूर कोणाजवळ आहेत बरें ? मला त्यांची आठवण होते. त्यांनीं केलेले दोन चमत्कार अनुभवास आलेले आहेत. एक चमत्कार म्हणजे जादुगारीण परीला घुंगुरांनीं मोर केलें आणि दुसरा अत्यंत वाईट चमत्कार म्हणजे मला त्यांनीं रानटी वानरी बनविलें ! आतां तिसरा चमत्कार होऊं नये, असें मला वाटतें. तर घुंगूर तुमच्याजवळ असल्यास ते मला द्या. मी त्यांची कायमची विल्हेवाट लावितें ! "

राणीचें बोलणें ऐकून मोहिनी परी म्हणाली,

" नको ग बाई, तुझ्याजवळ घुंगूर ते ! तूं ते जादूचे घुंगूर मागूं नकोस. त्यांचा मालक कोण याचा आम्ही शोध करीत आहोंत. त्याच्याजवळ आम्ही ते देणार आहोंत ! "

सुहासिनीला हसूं आलें व ती म्हणाली,

हे घुंगूर माझ्या आजोबांनीं मला दिले होते. म्हणून मी ते शोधीत आहें. "

त्यानंतर जादुगारीण परीनें सुहासिनीला विचारलें,

"तुझे आजोबा यक्ष होते. त्यांनीं तुला घुंगूर दिले होते ना ? मग तूं त्यांचें काय केलेंस ? सांग आम्हांला ! "

" माझे ते घुंगूर कोणी तरी नेले. पुढें ते मला एका मोराच्या पायांत दिसले. कदाचित् सुरेशनें ही गोष्ट केली असेल. "

सुरेश हा सुहासिनीचा सावत्र भाऊ होय. त्याच्या वडिलांचें नांव वीरचंद्र असें होतें. त्या काळीं हिमालयांत एक मोठें राज्य होतें. त्याचा राजा हा वीरचंद्र होता. त्या राजाकडे स्वर्गांतील गंधर्व येत असत. यक्ष येत असत. अप्सराहि येत असत. वीरचंद्र राजा सर्वांचा सत्कार करीत असे. तो प्रजेलाहि आपल्या मुलांप्रमाणें

वागवीत असे. त्यामुळें प्रजा त्याच्यावर फार प्रेम करीत होती.

वीरचंद्र राजाला दोन राण्या होत्या. पहिली राणी एका यक्षाची कन्या होती. तिला एकच मुलगी झाली. तीच ही सुहासिनी होय.

वीरचंद्राची दुसरी राणी अप्सरा होती. तिलाहि एकच पुत्र झाला. त्याचें नांव सुरेश होय.

लग्नाच्या वेळीं अप्सरेनें राजाला एक अट घातली होती, " मला मुलगा होईपर्यंत मी तुजजवळ राहीन. नंतर तो मुलगा तुझ्या स्वाधीन करीन आणि मी स्वर्गांत जाईन. तूं त्या मुलाचा चांगला सांभाळ कर. त्यांत चूक होऊं देऊं नको. चूक झाल्यास हे राजा, तुझें राज्यच जाईल ! "

अप्सरा राणीला मुलगा झाला. तेव्हां पहिल्या राणीला फार वाईट वाटलें. तिला वाटत होतें कीं, आपली मुलगी सुहासिनी राज्याची मालक होईल. तिचें लग्न झालें म्हणजे जांवयालाच राज्य मिळेल.

पण आतां अप्सरा राणीला सुरेश झाला. तो दिवसेंदिवस वाढूं लागला. तो रूपानें चांगला होता; आणि सद्‌गुणी होता. त्याच्यावर वीरचंद्राचें प्रेम बसूं लागलें. त्यामुळें सुहासिनीची आई मनांत फारच

चरफडूं लागली. ही राणी सुरेशचा राग राग पण करूं लागली.

पुढें सुरेश मोठा झाला. त्याला सर्व प्रजा मानूं लागली. आतां त्याला युवराज करावें, असें वीरचंद्र राजानें ठरविलें.

या वेळीं सुहासिनीच्या आईला अत्यंत वाईट वाटलें. सुरेशला राज्यांतून घालवून द्यावें म्हणजे त्याचा कांटाच निघेल, त्याला राज्य मिळूं शकणार नाहीं, असें तिला वाटलें. तसें करण्याचा यत्न ती करूं लागली.

सुहासिनीचे आजोबा एक यक्ष होते. ते मोठे जादुगार होते. त्यांनीं सुहासिनीला जादूची विद्या शिकविली होती. त्या यक्षानेंच सुहासिनीला हे सोन्याचे घुंगूर दिले होते. ते घुंगूर देतांना यक्षानें सुहासिनीला कांहीं गुप्त गोष्ट सांगितली होती. ती अशी कीं, " तूं हे घुंगूर सुरेशचे पायांत घाल ! ताबडतोब तो मोर होईल ! तो तुझ्यापुढें नाचूं लागेल ! त्याला मागची आठवण राहाणार नाहीं ! "

घुंगुरांत अशा प्रकारची विलक्षण जादू होती. ती जादू समजल्यामुळें सुहासिनीस अत्यंत हर्ष झाला.

तो तिच्या पोटांत मावेना. तिनें ती गोष्ट आपल्या विश्वासांतील दासीला सांगितली.

पण ती दासी चतुर होती. तिनें हळूच ही गोष्ट सुरेशच्या कानांवर घातली.

सुरेशला सुहासिनीचा दुष्ट हेतु कळला. त्यानें त्या दासीच्या मदतीनें ते घुंगूर आपल्या ताब्यांत घेतले; आणि तो दूर हिमालयांत निघून गेला.

सुरेशला राज्य नको होतें. त्याला पुष्कळ विद्या शिकावयाची होती. तेथें एका गुरूकडून तो सर्व विद्या शिकला. एका यक्षाकडून तो जादुविद्याहि शिकूं लागला.

त्या यक्षाकडे एक परी जादुविद्या शिकत होती. ती परी अत्यंत सुंदर होती. सुरेशहि सुंदर होता. त्याला ती परी आवडली. दोघेंहि तरुण होतीं. विचारी होतीं.

पण परीला जादूची विद्या पुरी शिकावयाची होती, म्हणून ती सुरेशशीं लग्न करण्यास तयार होईना. कारण विद्या शिकण्यांत तिला खरा आनंद वाटत होता. यासाठीं ती एका दूरच्या कुबेराच्या वनांत गेली.

पण तिचा गुरु यक्ष होता. त्यानें त्या परीला शोधून काढलें. सुरेश अपराधी होता. तेव्हां यक्ष गुरूनें

अनुक्रम २४३३ दिनांक ३१.८.११ क्रमांक ८८४ वाचनालय

सुरेशलाच एका गुहेंत कोंडून ठेवण्याची शिक्षा दिली. ती गुहा फार गुप्त ठिकाणीं होती.

पुढें त्या परीला पश्चात्ताप झाला. तिनें सुरेशचा शोध चालविला, पण तिला ती गुहा सांपडली नाहीं. परीमुळेंच आपण गुहेंतील कैदेंत पडलों, असें सुरेशला वाटलें. त्या परीचा त्याला रागहि आला. तिचा सूड घ्यावा, असें सुरेशला वाटूं लागलें.

इकडे सुरेश कैदेंत पडला, ही गोष्ट सुहासिनीच्या कानांवर गेली. तिला आतां अत्यंत हर्ष झाला.

तिची आई आतां सुहासिनीसाठीं वर शोधूं लागली.

त्या वेळीं हिमालयापासून फार दूर राजनगरचें राज्य होतें. तेथें दीपचंद्र राजा नुकताच गादीवर बसला होता. तोहि तरुण आणि शूर होता. त्याचे वडील शिवाचे भक्त होते. त्यांनीं नगराजवळील उद्यानांत महादेवाचें सुंदर देवालय बांधलें होतें. त्या महादेवाचे सेवेसाठीं स्वर्गांतील अप्सरा, पऱ्या, यक्ष, गंधर्व येत असत. राजानें पुष्कळ देश जिंकले होते. त्याला एका यक्षानें पुष्कळ धन दिलें होतें. त्याचाच पुत्र हा दीपचंद्र होय. तो वयांत आला. नंतर त्याच्या वडिलांनीं आपलें

राज्य स्वाधीन केलें आणि ते वनांत तप करण्यासाठीं निघून गेले.

दीपचंद्र हा सुहासिनीचे वडील वीरचंद्र यांचा दूरचा नातलग होता. तो पराक्रमी होता. त्याची कीर्ति चोहोंकडे पसरली होती.

दीपचंद्राचा लौकिक वीरचंद्रांस माहीत झाला. सुहासिनीस हा अनुरूप वर आहे, असें त्यांना वाटलें.

वीरचंद्रांचा विचार सुहासिनीला पटला, पण प्रथम दीपचंद्राला पाहावें, अशी इच्छा तिच्या मनांत आली. तेव्हां गुप्तपणें दीपचंद्राला आपल्या राजधानींत आणावें, असें सुहासिनीनें ठरविलें.

सुहासिनीच्याच मैत्रिणी मोहिनी व बोधिनी ह्याहि दोन पऱ्या होत्या. मोहिनी परीला सर्व मंत्र-विद्या अवगत होती.

दीपचंद्राला आपलेकडे घेऊन यावें, अशी कामगिरी सुहासिनीनें या दोन्ही पऱ्यांकडे सोपविली.

दोन्ही पऱ्या ताबडतोब दीपचंद्र राजाकडे गेल्या. त्या पऱ्यांना पाहून दीपचंद्र राजा चकित झाला. त्या पऱ्यांनीं सुहासिनीची माहिती दीपचंद्राला सांगितली, पण तो सुहासिनीकडे येण्यास तयार होईना. कारण,

त्या राजाला तेथें आलेली मोहिनी परीच अत्यंत आवडली होती !

पण मोहिनीला आपलें कर्तव्य करावयाचें होतें. तिनें हंसत-खेळत दीपचंद्राला उद्यानांत नेलें. तेथें महादेवाच्या देवालयांत तो विश्रांतीसाठीं बसला होता. तेथेंच मोहिनीनें दीपचंद्रावर मंत्राचें पाणी शिंपडलें. त्या मंत्रामुळें तो सुंदर पारवा झाला !

त्या पारव्यास घेऊन त्या दोन्ही पऱ्या सुहासिनी-कडे आल्या. त्यांनीं सुहासिनीला सर्व प्रकार कळविला. सुहासिनीनें त्या पारव्यास एका रत्नजडित सुंदर पिंजऱ्यांत ठेविलें.

सुहासिनी हि मंत्रविद्येंत निपुण होती. रात्रीच्या वेळीं तिनें पारव्यावर मंतरलेलें पाणी शिंपडलें. तेव्हां तेथें पारव्याचा दीपचंद्र राजा झाला !

दीपचंद्रानें सुहासिनीचें रूप व वैभव पाहिलें. तो चकित झाला. तेथें दोन्ही पऱ्या होत्याच. त्या दीपचंद्रा-कडे पाहून गालांतल्या गालांत हसूं लागल्या.

—•—

# २. यक्षांचे शाप!

यक्षानें सुरेशला एका गुहेंत कोंडून ठेविलें होतें. त्या गुहेंतच सुरेश तप करूं लागला. तेथें त्यानें पुष्कळ काळ तप केलें.

एके दिवशीं त्याला एक स्वप्न पडलें. त्या स्वप्नांत त्याच्यापुढें एक जटाधारी पुरुष आला. त्यानें सुरेशच्या



राक्षस झालेला यक्ष सुरेशला पाठीवर घेऊन आकाशांतून चालला आहे.

मस्तकावर हात ठेविला. त्याला आशीर्वाद दिला. नंतर त्यानेंच सुरेशला त्या गुहेंतून बाहेर जाण्याचा मार्ग सांगितला.

सुरेश जागा झाला. त्याला तो जटाधारी पुरुष दिसला नाहीं. ते प्रत्यक्ष शंकरच स्वप्नांत आले असले पाहिजेत, असें सुरेशला वाटलें. त्यांनीं सांगितलेल्या मार्गानें तो जाऊं लागला.

तो मार्ग पुष्कळ लांबीचा होता. शेवटीं तो संपला. आणि पुढें त्याला उजेड दिसूं लागला. तो त्या गुहेच्या तोंडाशीं आला. आतां आपण बाहेर पडणार, अशा आनंदांत सुरेश होता; पण त्याच्यापुढें एक भला मोठा राक्षस येऊन उभा राहिला ! तो सुरेशला म्हणाला, "तुला येथून बाहेर जातां येणार नाहीं !"

सुरेशला आश्चर्य वाटलें. त्यानें धीटपणें त्या राक्षसास विचारलें,

"हे दयाळू राक्षसा, तूं मला कां अडवितोस? तुला येथें कोणी पाहारा करण्यासाठीं नेमलें आहे काय?"

राक्षस शांतपणें म्हणाला,

"तुला कैदेंत टाकलेल्या यक्षानेंच पाहारा करण्यासाठीं मला येथें ठेविलें आहे. तेव्हां मला माझें काम केलें पाहिजे ना!"

सुरेशला खरी स्थिति समजली. नंतर त्यानें मनांतल्या मनांत महादेवाचा धावा केला. नंतर एकदम तो त्या राक्षसास म्हणाला,

" मग येथून बाहेर पडण्यास कांहीं उपाय आहे का ? हे राक्षसा, कृपा करून तो उपाय मला सांग ! "

राक्षसानें थोडा वेळ विचार केला. नंतर तो बोलला, " त्याला एक उपाय आहे. मी खरा यक्षाचाच मुलगा आहें. माझे वडील तुला जादुविद्या शिकवीत होते. तूं तेथील एका परीवर प्रेम करूं लागलास तें तुझ्या गुरूंना आवडलें नाहीं. म्हणून तूं येथील कैदेंत पडलास. आतां त्या परीला वाईट वाटत आहे. ती तुझा शोध करीत आहे. कदाचित् ती परी तुला जादुविद्येनें येथून सोडवील ! "

सुरेश राक्षसास म्हणाला,

" त्या परीनें माझें म्हणणें ऐकलें नाहीं. आतां ती मला नको आहे. तिचा मी आतां सूड घेणार आहें ! "

राक्षस म्हणाला, " वेड्या, तूं येथें कैदेंत आहेस ना ? मग त्या परीचा सूड तूं कसा घेणार ? "

सुरेशनें विचार केला आणि तो बोलला,

" हे राक्षसा, तुझें एकादें काम मला सांग. मी तें करीन. माझें काम तूं कर. मला येथून सोडव म्हणजे झालें ! "

राक्षसानें आनंदानें टाळी वाजविली. नंतर तो म्हणाला,

" ठीक आहे. मी खरा यक्षाचा पुत्र आहें हें लक्षांत ठेव ! येथें पाहारा करण्यासाठीं वडिलांनीं मला राक्षसाचें रूप दिलेलें आहे. माझें काम फार सोपें आहे. तुझी बहीण सुहासिनी मला मिळवून दे म्हणजे झालें ! प्रथम तिनें मला विवाहाचें वचन दिलें होतें. आतां तें वचन ती पाळीत नाहीं. राजनगरचा राजा दीपचंद्र याच्याशीं लग्न करण्याचा तिचा विचार ठरला आहे. "

सुरेश म्हणाला, " बरें तर. मला येथून मुक्त कर. नंतर आपण प्रयत्न करूं. "

राक्षसानें बराच विचार केला. तो आणि सुरेश हे यक्षाजवळ जादुविद्या शिकत होते. त्यामुळें राक्षस म्हणजे यक्षपुत्र सुरेशचा गुरुबंधूच होता. यक्षपुत्रानें सुरेशचें म्हणणें मान्य केलें. आतां राक्षसाचें रूप टाकून तो यक्ष झाला. नंतर ते दोघेहि एका रात्रीं गुहेंतून बाहेर पडले.

यक्षाला कोठेंहि जलद जातां येतें. त्याला कोणतेंहि रूप घेतां येतें !

ती चांदणी रात्र होती. प्रथम ते कुबेराच्या उद्यानांतून हिंडूं लागले. तेथें चोहोंकडे फुलांचा सुगंध

दरवळलेला होता. आकाशांतून पऱ्या इकडे तिकडे मजेनें हिंडत होत्या. हेंहि त्यांना दिसत होतें.

पुढें पुन्हा यक्षानें राक्षसाचें रूप घेतलें आणि सुरेशला पाठीवर घेऊन तो आकाशांतून अत्यंत वेगानें चालला.

मध्यरात्रीं ते दोघे सुहासिनीच्या राजवाड्यांत आले. रूपें बदलून गुप्त रूपानें त्यांनीं सुहासिनीच्या महालांत प्रवेश केला.

त्याच वेळीं सुहासिनीनें पारव्यास पिंजऱ्यांतून बाहेर काढलें. त्याच्यावर मंत्राचें पाणी शिंपडलें. ताबडतोब पारव्याचें रूप बदललें. तेथें सुंदर दीपचंद्र राजा दिसूं लागला.

सुहासिनीनें दीपचंद्राला विचारलें,

"हे राजा, तूं माझें ऐकणार ना? नाहीं तर जन्मभर पारवाच राहाशील! तूं माझ्याशीं विवाह कर आणि सुखी हो! माझ्या वडिलांचें राज्यहि तुलाच मिळेल!"

दीपचंद्र म्हणाला, "हें राज्य सुरेशचें आहे. तो फार शूर आहे. त्याच्यावर महादेवाची कृपा आहे. तो जिवंत आहे. त्याची आई अप्सरा आहे. हें जगाला माहीतच आहे. तेव्हां असा पुरुष तुला हें राज्य पचूं देईल का! याचा प्रथम विचार कर!"

सुहासिनी म्हणाली, " माझे आजोबा बलाढ्य यक्ष आहेत. त्यांनीं सुरेशाचा कायमचा निकाल लाविला आहे. तुला हें माहीत नाहींसें दिसतें."

दीपचंद्र म्हणाला, " सुरेश सद्‌गुणी आहे. देव त्याला तारील. त्याच्यावर सर्वांचें प्रेम आहे. तुझे वडील तरी तुला अनुकूल आहेत का ? "

सुहासिनीचा चेहरा उतरला. ती भीत भीतच बोलली, " माझे वडील महादेवाचे भक्त आहेत. त्यांना सुरेश पाहिजे आहे. त्यासाठीं ते एका गुप्त जागीं तप करीत आहेत ! "

इतक्यांत सुहासिनीचे वडीलच तेथें आले. ते तिला घाईघाईनें म्हणाले,

" सुहासिनी ! मला देवाचा दृष्टांत झाला आहे. तुला येथें राहाण्यांत धोका आहे. तूं ताबडतोब येथून निघून जा ! दीपचंद्राबरोबर राजनगर गांठ ! तेथें या राजाशीं विवाह कर. तुझ्यामागें एक यक्षपुत्र लागला आहे, हें ध्यानांत ठेव. तो तुझा नाश करील ! "

कोणा तरी यक्षाचा डोळा सुहासिनीवर आहे, हें दीपचंद्राला समजलें; पण आतां त्याला पारवा होऊन राहावयाचें नव्हतें. यासाठीं त्यानें सुहासिनीचें म्हणणें मान्य केलें.

सुहासिनीनें घडलेला वृत्तांत पऱ्यांना सांगितला. नंतर सुहासिनी राजनगरास निघाली. मोहिनी व बोधिनी या दोघी पऱ्या तिच्याबरोबर येणार होत्या.

पण मोहिनीला पाहातांच राजाचें मन हेलकावे खाऊं लागलें. तो मोहिनीजवळ गेला आणि तिच्याशीं गोड गोड बोलूं लागला.

सुहासिनीच्या नजरेस ही गोष्ट पडली. ती मोहिनी-वर कडाडली. तेव्हां मोहिनी सुहासिनीला म्हणाली,

" सुहासिनी, तूं उगीच क्रुद्ध होऊं नकोस. तूंच आम्हांस बोलाविलेंस ना ? मग असा आमचा अपमान कां करतेस ? "

सुहासिनी रागानें म्हणाली,

" तुम्ही दोघी कपटी आहांत. राजाला तुम्ही भुलवीत आहांत !"

दोन्ही पऱ्या एकदम उसळल्या व बोलल्या,

"सुहासिनी, आम्ही कपटी नसून तूंच खरीखुरी कपटी आहेस ! सुरेशला तूंच नाहींसें केलें आहेस. एका यक्षपुत्रास वचन देऊन तूंच त्याला फसविलें आहेस ! याचा जाब तुला द्यावा तुला लागेल ! पुढें मागें तुझ्यावर संकटें आल्याशिवाय राहाणार नाहींत ! तेव्हां आमचीच मदत

तुला लागेल ! बाई, जा आतां जा दीपचंद्राबरोबर ! जातांना आम्हांला असें वाईटसाईट बोलूं तरी नकोस ! ”

इतकें बोलून त्या पऱ्या तेथून गेल्या. त्यांना सुरेशचा शोध करावयाचा होता. शिवाय गुप्तपणें सुहासिनीच्या मागून जावयाचें होतें.

हा सर्व प्रकार यक्ष व सुरेश हे गुप्तरूपानें पाहात होते. नंतर ते तेथून निघून गेले.

आतां जादुगारीण परीला बरोबर घेऊन सुहासिनी राजनगरला चालली होती. त्यापूर्वी सुरेशची आई सुरेशला भेटली होती. तिनें सावध राहण्याचा इशारा त्याला दिला होता.

वाटेंत सुहासिनीचे आजोबा यक्ष तिला भेटले. तेव्हां सुहासिनीनें त्यांना सांगितलें कीं, सुरेशला ठार करा. म्हणजे माझ्या मागची पीडा टळेल !

यक्ष विचारी होता. तो सुहासिनीला म्हणाला,

“ तसें करणें योग्य होणार नाहीं. शिवाय सुरेशची आई अप्सरा आहे. ती स्वर्गांतून अमृत आणील आणि सुरेशला जिवंत करील ! ”

सुहासिनीला काळजी वाटली. तिच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले. ती स्फुंदत स्फुंदत बोलली,

"सुरेशचा कायमचा जन्माचा त्रास माझ्यामागें आहेच. मग संसार कसला? त्यांत सुख तें कोणतें असणार?"

सुहासिनीचा कळवळा येऊन यक्ष म्हणाला,

"सुहासिनी! तूं काळजी करूं नकोस. मी कडक तप केलें आहे. त्याच्या जोरावर मी सुरेशचें रूपांतर करीन. तसें त्याचें बदललेलें रूप चोवीस वर्षें टिकेल! मग तर झालें?"

त्यानंतर यक्ष कांहीं बोलणार, इतक्यांत तेथें सुरेशच प्रगट झाला! त्यानें एक जोराचा वार त्या यक्षावर केला.

तो वार त्याच्या मर्मावर लागला. तरीहि त्यानें एका विलक्षण मंत्राचा जप केला व तो म्हणाला,

सुरेश, तूं पुण्यवान आहेस. पण मींहि प्रखर तप केलें आहे, तेव्हां तुला मी शाप देतों!

"तूं चोवीस वर्षें पक्षी होशील! पण तुला एक सवलत देतों कीं, तुझ्या इच्छेप्रमाणें तूं कोणताहि पक्षी होशील! ही गोष्ट आठ दिवसांच्या आंत घडून येईल!"

या शापानें सुरेशला प्रथम वाईट वाटलें. मग त्यानें विचार केला. पक्षी झालों, तरी परमेश्वराची

भक्तीच करीन. पोपट होऊन एकाद्या देवालयांत गुप्तपणें राहीन !"

सुरेशबरोबर त्याचा यक्ष मित्रहि होता. त्याला सुहासिनीचा संताप आला. तो सुहासिनीला म्हणाला,

"तूं माझा वचनभंग केला आहेस ! खरें आहे ना हें ? त्या पापामुळें तुझेहि असेच हाल होतील !"

सुरेशच्या वारानें तिचा आजा तळमळत होता. तशा स्थितींतहि तो सुहासिनीला म्हणाला,

"झाला हा प्रकार पुरे झाला. सुहासिनी, तुझींच पापें तुला नडतात !"

इतक्यांत सुरेशाचा मित्र यक्षपुत्र गरजला, "सुहासिनी ! जा आतां दीपचंद्राबरोबर चोवीस वर्षें सुखानें संसार कर. मग तुझ्यावर फार मोठी आपत्ति येईल ! हा माझा शाप आहे. लक्षांत ठेव !"

—•—

# ३. अप्सरा व सुहासिनी !

सुहासिनीचे आजोबा यक्ष यांच्यावर सुरेशनें केलेला प्रहार जबरच होता; पण तो यक्ष होता. शंकराची सेवा करणारा होता. त्यामुळें त्याला शंकरांनीं वांचविलें.



सुहासिनी अप्सरेचे पाय धरते.

सुहासिनीबरोबर तिचे यक्ष मामा होते. तिनें मोहिनी व बोधिनी या पऱ्यांची समजूत घातली होती. त्यांना लग्नासाठीं आपल्याबरोबर घेतलें होतें. त्यांच्या

पाठोपाठ सुरेश व त्याचा यक्ष मित्र हे गुप्तपणें चालले होते.

वाटेंत जादुगारीण परीचा किल्ला लागला. त्या परीनें सर्वांचा सत्कार केला. ती परीहि लग्नासाठीं राजनगरास निघाली.

जादुगारीण परीला पाहातांच सुरेश यक्ष मित्राला म्हणाला, " या जादुगारीण परीमुळें मी संकटांत पडलों. तेव्हां तिला पण कांहीं तरी अद्दल घडविली पाहिजे, असें मला वाटतें. "

यक्ष मित्रानें सांगितलें,

" सुरेश, तुझें म्हणणें खरें आहे. आपण आतां राजनगरास जाऊं. नंतर तेथें या परीला काय करावयाचें तें पाहूं. "

राजनगरांत सुहासिनी व दीपचंद्र यांचें लग्न मोठ्या थाटामाटांत झालें. नंतर त्या तिन्ही पऱ्या राजाच्या उद्यानांत मजेनें विहार करूं लागल्या.

सुरेश व त्याचा यक्ष मित्र त्या बागेंतील महादेवाच्या देवालयांत गुप्तपणें राहिले होते.

एके दिवशीं त्या पऱ्या रात्रीच्या वेळीं देवालयांत राहिल्या. त्यांनीं बागेंतील फळें मनमुराद खाल्लीं होतीं. तलावांत त्यांनीं खूप वेळ क्रीडा केली होती, त्यामुळें

त्या आनंदांत होत्या. त्या एकमेकींत मजेमजेच्या गप्पागोष्टी करीत होत्या. त्यावेळीं मोहिनी परी म्हणाली,

" सख्यांनो, सुरेश राजा गुणी आहे. तो शूर आहे. सुंदर आहे. तो कोणालाहि आवडेल असाच आहे. पण त्याचा नाश सुहासिनीनें केला ! काय बिचाऱ्याचें दुर्दैव हें ? "

नंतर बोधिनी परी जादुगारणीकडे बोट दाखवीत म्हणाली, "पण मी खरं सांगू का ? या जादुगार परीमुळें त्याला त्रास झाला ! कां ग तूं त्याला झिडकारलेंस ? "

जादुगारीण परी बोलली,

" अग, त्याला तप करावयाचें होतें, मला जादू शिकावयाची होती. मग आमचें दोघांचें जुळणार कसें ? आतां सुहासिनीच्या आजोबानें त्याला शाप दिला आहे. तर त्याला म्हणावें, बाबा, पक्षी होऊन खुशाल तप कर बरं ! "

नंतर त्यांना निद्रेनें गाठलें. त्या तेथेंच झोपल्या.

सुरेश व त्याचा यक्ष मित्र देवालयाच्या आंतील गाभाऱ्यांत गुप्तपणें होते. पऱ्या झोपल्यानंतर यक्ष सुरेशला म्हणाला,

" सुरेश ! तुला आतां सुहासिनीच्या आजोबांच्या शापामुळें पक्षी व्हावें लागणार आहे. तेव्हां तूं पोपट

होऊन येथेंच राहा. मीहि मोठा जादुगार आहें. तेव्हां मी तुझ्या राहाण्याची गुप्तपणें व्यवस्था करतों. तूं पोपट झालास, तरी माणसाप्रमाणें तुला सर्व कांहीं कळूं शकेल. माणसासारखें तुला बोलतांहि येईल. तुझ्याजवळ घुंगूर आहेतच. त्यांचा आतां उपयोग करूं या ! ”

सुरेश म्हणाला, “ मित्रा, तुझ्या सांगण्याप्रमाणें मी वागेन. तुझा आधार असल्यावर मला काय कमी पडेल बरें ? पण आतां घुंगरांचा उपयोग कसा करावा, याची योजना तूं ठरविली असशीलच. ती मला सांग!”

यक्ष म्हणाला, “ ही जादुगारीण परी तुझ्या त्रासाला मूळ कारण आहे, हें खरें ना ? मग आतां हें घुंगूर तिच्याच पायांत घालूं या, म्हणजे ती मोर होईल. देवापुढें नाचूं लागेल. तुलाहि तिची सोबत होईल. ”

सुरेश म्हणाला, “ ठीक आहे. घे हे घुंगूर ! तूं तुझ्या इच्छेप्रमाणें कर. मला शंकराची सेवा करावयाची आहे. पोपट होऊनहि मी तप करीत राहीन. चोवीस वर्षें तेव्हांच निघून जातील.

माझे वडील माझ्यासाठीं दुःख करतील. तरी तूंच त्यांची समजूत कर. त्यांचें रक्षणहि कर. जें व्हावयाचें तें होतेंच. मग दुःख मानून काय उपयोग ? ”

यक्षानें ते घुंगूर झोपलेल्या जादुगारीण परीच्या पायांत घातले. चमत्कार असा कीं, ती परी सुंदर मोर झाली आणि देवापुढें नाचूं लागली !

पाहाटेस मोहिनी आणि बोधिनी या पऱ्या जाग्या झाल्या. त्यांना जादुगारीण परी दिसेना. तेव्हां जादुगारीण परी रात्रीं निघून गेली असावी, असें त्यांना वाटलें.

देवालयापुढें एक सुंदर मोर नाचत आहे, त्यानें आपला पिसरा पसरला आहे, तो गिरक्या मारीत आहे, हें त्यांना दिसलें. त्यांना मोराची गंमत वाटली. पण परीच मोर झाली आहे, हें त्यांना कळूं शकलें नाहीं !

सुरेशची आई अप्सरा स्वर्गांत होती. तिला सुरेशच्या शापाची माहिती कळली. हें सुहासिनीचेंच कपट असलें पाहिजे, असें तिला वाटलें.

सुरेशचा मित्र यक्ष वीरचंद्रांकडे गेला. त्यानें त्यांना धीर दिला. आणखी कांहीं वर्षें तप करीत राहावें, असें यक्षानें त्यांना सुचविलें.

सुरेशची आई सामर्थ्यवान् होती. तिनें सुरेशच्या राज्याचा ताबा घेतला. सुहासिनीला तें राज्य मिळूं द्यावयाचें नाहीं, असें तिनें ठरविलें होतें.

नंतर ती अप्सरा राजनगरास आली. ती फार क्रुद्ध झालेली होती. तिनें सुहासिनीस गाठलें व विचारलें,

" सुरेश कोठें आहे, सांग मला ! "

पण सुरेश कोठें होता, हें सुहासिनीस माहीत नव्हतें. तेथें असलेल्या मोहिनी व बोधिनी या पऱ्याहि गुपचूप राहिल्या. त्यामुळें अप्सरेचा राग चढला. ती तेथून निघाली, पण जातांना तिनें सुहासिनीस शाप दिला !

" माझा सुरेश चोवीस वर्षें मला दिसणार नाहीं, असें मला कळलें आहे. तोंपर्यंत तूंहि संसार कर; पण तुला संसारांत सुख लागणार नाहीं ! सुरेश प्रगट झाला कीं, तूं भयंकर संकटांत सांपडशील ! "

अप्सरेच्या शापामुळें सुहासिनी दुःखी झाली. तिच्या डोळ्यांपुढें तिचीं पापें उभीं राहिलीं. सुरेशला आपण नाहक छळलें, याचा तिला पश्चात्ताप वाटला. तिला अप्सरेचें भय वाटूं लागलें. तिच्या डोळ्यांतून घळघळ अश्रू वाहूं लागले. रडत रडत तिनें अप्सरेच्या पायांवर डोकें ठेवलें व ती कापऱ्या स्वरांत बोलली,

" माते, मी पापी आहें. मला पश्चात्ताप झाला आहे. तरी मला तूं कांहीं तरी चांगला आशीर्वाद दे. मला क्षमा कर ! तूं माझी आईच आहेस. माझे अपराध पोटांत घाल. माझ्यावर दया कर ! "

अप्सरा दयाळू होती. सुहासिनीला खराच पश्चात्ताप झालेला होता. तेव्हां तिला अप्सरेनें चांगला आशीर्वाद दिला. ती सुहासिनीला म्हणाली,

"तुझीं दुःखें टळणार नाहींत. तीं तुला भोगावींच लागतील ! पण तुला एक चांगला आशीर्वाद देतें. तुला एक सुंदर कन्या आणि तेजस्वी पुत्र होईल. दोन्ही मुलें तुझ्या घराण्याची कीर्ति वाढवितील."

इतकें बोलून अप्सरा तेथें थांबली नाहीं. ती तडक आकाशांतून जाऊं लागली.

पृथ्वीवरील लोक तिच्याकडे आश्चर्यानें पाहूं लागले.

सुरेशमुळें अप्सरेनें शाप दिला आहे. तेव्हां सुरेशचा शोध लावावा. यक्ष आजोबांना भीड घालून त्यांना सुरेशचा शाप परत घेण्यास सांगावें, असेंहि सुहासिनीला वाटलें.

यासाठीं सुहासिनी मोहिनी परीला म्हणाली,

"सुरेशचा शाप माझे आजोबा परत घेतीलहि. पण आतां आठ दिवस होऊन गेलेत. तेव्हां सुरेश कोणता तरी पक्षी झाला असेल, तरी त्याचा तपास तुम्ही दोघी कराल का ? तुम्ही पऱ्या आहांत. कोठेंहि जाऊं शकतां."

मोहिनीनें गंभीरपणें उत्तर दिलें,

" आतां ती गोष्ट होणें अशक्य आहे. सुरेशच्या नशिबाप्रमाणें या गोष्टी घडत आहेत."

सुहासिनी पुढें कांहीं बोलली नाहीं.

इकडे सुरेशचा यक्ष-मित्र हिमालयांत गेला. सुरेश लवकर पोपटयोनींतून मुक्त व्हावा, यासाठीं तो उग्र तप करूं लागला.

पुष्कळ वर्षें तप झाल्यानंतर त्याची निष्ठा पाहून महादेवहि प्रसन्न झाले. त्यांनीं प्रगट होऊन त्या तरुण यक्षाला सांगितलें,

" हे यक्षा, तूं मित्रासाठीं हें घोर तप करीत आहेस. पण लक्षांत घे कीं, सुरेश हा मागील जन्मीं गंधर्व होता. स्वर्गांत त्याच्या हातून कांहीं पाप घडल्यामुळें त्याला या लोकांत यावें लागलें आहे आणि आतां पोपट व्हावें लागलें आहे. तो माझी सेवा करीत आहे. तेव्हां मजजवळच्या सर्व विद्या मी त्याला शिकवीत आहें. "

त्याचें राज्य त्याची आई अप्सरा चालवीत आहे. तरी तिचा तूं प्रधान हो. सुरेश प्रगट होण्यास आतां थोडीं वर्षें राहिलीं आहेत. तीं तेव्हांच संपतील !

# ४. पोपटाचा सुरेश झाला !

सुरेशला पोपट होऊन आतां चोवीस वर्षे पूर्ण झालीं होतीं. त्याच्या सुटकेची वेळ सुरेशचा मित्र यक्ष याला माहीत होती. तो नेमका त्या वेळीं राजनगरांतील उद्यानांत आला. तेथील देवालयांत सुरेश पोपटाच्या रूपांत होता.



सुरेश प्रगट झाला त्याच वेळीं दीपचंद्राचा प्राण चालला !

मध्यरात्रीं यक्ष देवालयांत आला. तो शंकराची स्तुति करूं लागला. शंकरांनीं सुरेशला पोपटाचा माणूस केलें! नंतर त्याला त्याच्या यक्ष मित्राच्या स्वाधीन केलें.

अनुक्रमांक

त्या वेळीं सुरेश अत्यंत सुंदर दिसत होता. त्याचा मित्र यक्ष यानें सुरेशला प्रेमानें आलिंगन दिलें. उभयतांच्या डोळ्यांतून अश्रू वाहूं लागले.

पाहाट झाली. त्या दोघांनीं शंकराचीं स्तोत्रें म्हणण्यास प्रारंभ केला. मोहिनी व बोधिनी या पऱ्या त्या दिवशीं तेथें बागेंतच होत्या. त्यांना देवालयांतच सुरेश प्रगट झाला आहे, याची कल्पना नव्हती. सुरेश हा तेथेंच पोपटाच्या रूपांत आहे, हें त्यांना माहीतहि नव्हतें. त्या पऱ्या पाहाटेस देवाच्या दर्शनास आल्या. तेव्हां त्यांना तेथें सुरेश दिसला. त्याला पाहून त्यांचे डोळे आनंदानें भरून आले.

या पूर्वीं आठ-दहा दिवस जादुगारीण परी राजनगरास आली होती. तिच्याजवळ ते सोन्याचे घुंगूर होते. ते तिनें सुहासिनीला दाखविले. त्याबरोबर ती थरथर कांपूं लागली.

सुहासिनी जादुगार परीस म्हणाली,

"बाई, ते घुंगूर मला दाखवूं नकोस. आतां तूं सुरेशचा शोध कर आणि त्याच्या स्वाधीन हे घुंगूर कर. आतां सुरेशचीं पुरीं चोवीस वर्षें झालीं आहेत !"

सुरेश प्रगट झाल्याची वार्ता जादुगार परीस कळली. ती परी भीतभीतच बागेंतील देवालयांत गेली !

तेथें मोहिनी व बोधिनी या पऱ्या होत्याच. त्यांनीं तिचें स्वागत केलें. पुढें सुरेशकडे तिनें पाहिलें. तिचे डोळे भरून आले होते. तिला पश्चात्ताप झालेला होता. तेव्हां सुरेश हसत हसत तिला म्हणाला,

" बाई, जें घडावयाचें तें घडून गेलें. तेव्हां मागच्या गोष्टी आतां आपण विसरूं या. शिवाय माझ्या मित्राची तूं आवडती आहेस ना ? मग मी तुझ्यावर रागावणें शक्य नाहीं ! "

आतां सुरेशला तेथें फार वेळ राहावयाचें नव्हतें. राजवाड्यांत त्याच्या स्वागताची तयारी चालली होती. पण वडिलांना अगोदर भेटण्यासाठीं येथून ताबडतोब निघावें, असें त्यानें ठरविलें.

सुरेशचे वडील कोठें आहेत, हें पऱ्यांना माहीत होतें. यक्षालाहि ठाऊक होतें. अत्यंत दूरच्या ठिकाणीं एका भुयारांत या सर्वांना जावयाचें होतें.

यक्ष, पऱ्या यांच्या मदतीनें हा त्यांचा प्रवास थोड्या वेळांत झाला. वडिलांना भेटतांच ते उद्गारले,

" शंकराची कृपा ! माझें तप फळाला आलें ! "

आतां वीरचंद्राच्या राजधानींत ही बातमी कळली. प्रजेला अत्यानंद झाला.

अरुण आणि नलिनी हीं मुलें मोठीं झालीं होतीं. तीं गुरूंच्या आश्रमांत शिक्षण घेत होतीं.

सुरेशचा पोपट झाला होता, ही गोष्ट सुहासिनीस समजली. त्यामुळें तिला आश्चर्याचा धक्का बसला ! सुरेश आपल्या वडिलांकडे गेल्याचेंहि तिला कळलें.

आतां अप्सरेनें तिला दिलेल्या शापाची आठवण झाली. सुहासिनीला मुलाचा वियोग झाला होता, ती स्वतः वानरी झाली होती, अशीं अनेक दुःखें तिनें भोगलीं होतीं. आतां सुरेशची आई अप्सरा आणखी काय करणार आहे, याची भीति तिला वाटत होती. भीतीमुळें ती काळी ठिक्कर पडली होती !

अशा चिंतेंत सुहासिनी होती. दीपचंद्रांच्या जवळ आपलें दुःख सांगावें, यासाठीं तीं राजाच्या दिवाणखान्यांत गेली.

पण त्या वेळीं दीपचंद्र तेथें नव्हते. ते वनांत शिकारीस गेले होते.

शिकार करून ते दमले. दुपारच्या वेळीं विश्रांतीसाठीं ते एका आंब्याच्या वृक्षाखालीं बसले.

त्या वृक्षाच्या नजीक एक प्रचंड वारुळ होतें. दीपचंद्राला दुर्बुद्धि सुचली. तो उठला. त्यानें एक धनुष्याचें टोंक वारुळांत खुपसलें !

लागलीच त्या वारुळांतून फुस् फुस् करीत एक प्रचंड नागीण बाहेर पडली ! तिनें राजाला कडकडून दंश केला ! क्षणार्धांत सळसळ करीत ती नागीण वारुळांत गडप झाली !

राजा तळमळूं लागला. लवकरच राजाचा प्राण चालला ! राजाचें सैन्य घाबरून गेलें. ताबडतोब नगरांत ही बातमी कळली. राणी अरण्यांत आली.

तिनें राजा मृत झाल्याचें पाहिलें. तिनें भयंकर शोक आरंभला. तिचा हंबरडा ऐकून वनांतील सर्वच जण रडूं लागले. जिकडे तिकडे दुःख पसरलें.

इतक्यांत आकाशांतून एक परी बोलली,

"राजांना राजवाड्यांत न्या. तेथें त्यांना काचेच्या घरांत ठेवा. एक महिना त्यांचा देह जिवंत असल्यासारखा राहील !

तुम्ही प्रयत्न करा. अमृताचा बिंदु मिळवा किंवा अमृतवल्लीचा थोडा रस संपादन करा. तो राजांच्या मुखांत घाला म्हणजे महाराज जिवंत होतील !"

आतां राजाचें काय झालें, पऱ्यांनीं कोणते प्रयत्न केले, ही कथा पुढील पांचव्या भागांत येईल.

अनुक्रम २४३३२
विभाग
IRBK-0106993
IRBK-0106993